सत्यमेव जयते

# विधानपरिषद विनंती-अर्ज समिती

## (२०१७-२०१८)

**"वैद्यनगर सिंधी कॉलनी, आर्णि रोड, यवतमाळ येथील विस्थापित लोकांचे पुनर्वसन करताना दिलेल्या भूखंडातील सत्ता प्रकार ब-२ चे वर्ग अ-१ मध्ये भोगवटादार म्हणून नोंद घेण्याबाबत" या विषयावरील ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा**

# अहवाल

**(दिनांक .... मार्च, २०१८ रोजी विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई.
मार्च २०१८

# विधानपरिषद विनंती-अर्ज समिती

## (२०१७-२०१८)

**"वैद्यनगर सिंधी कॉलनी, आर्णि रोड, यवतमाळ येथील विस्थापित लोकांचे पुनर्वसन करताना दिलेल्या भूखंडातील सत्ता प्रकार ब-२ चे वर्ग अ-१ मध्ये भोगवटादार म्हणून नोंद घेण्याबाबत" या विषयावरील ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा**

# अहवाल

## विधानपरिषद विनंती अर्ज समिती
## (२०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.

(३) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

(४) श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.

(५) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

*१ ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.

*२ ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**३ प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM)

(३) श्री. विलास आठवले, उप सचिव

(४) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

(५) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

**टिप-**

*ॲड. रामहरी रूपनवर वि.प.स. व ॲड हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांची दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७ रोजी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

*प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांची दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी विशेष निमंत्रित म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

**विधानपरिषद विनंती अर्ज समिती**
**(२०१६-२०१७)**

**समिती प्रमुख**

(१) श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) *श्री. गिरीष व्यास, वि.प.स.

(३) *प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

(४) *श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(५) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स

**विशेष निमंत्रित**

(६) श्री. कपिल पाटील, वि.प.स

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव

(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

(४) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

**टिप-**

*सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, प्रकाश बिनसाळे, अमरनाथ राजुरकर, वि.प.स. यांच्या रिक्त झालेल्या जागी अनुक्रमे सर्वश्री गिरीष व्यास, तानाजी सावंत, आनंद ठाकूर वि.प.स यांची २७ जानेवारी, २०१७ रोजी नामनियुक्ती करण्यात आली आहे.

## प्रस्तावना

"वैद्यनगर सिंधी कॉलनी, आर्णि रोड, यवतमाळ येथील विस्थापित लोकांचे पुनर्वसन करताना दिलेल्या भूखंडातील सत्ता प्रकार ब-२ चे वर्ग अ-१ मध्ये भोगवटादार म्हणून नोंद घेण्याबात" या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य ॲड. राहमरी रूपनवर, वि.प.स. यांनी दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी दिली व दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजी प्रस्तुतचा विनंती-अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती-अर्ज त्याच दिवशी विनंती-अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात आला. (परिशिष्ट एक)

विनंती अर्जात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांबाबत शासनाकडून आवश्यक ती माहिती मिळावी म्हणून उक्त विनंती अर्ज महसूल व वन (महसूल) विभागाकडे पाठविण्यात आला. या संबंधीची माहिती विभागाकडून दिनांक २६ मे, २०१७ व दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजी प्राप्त झाली.

समितीने विनंती-अर्जाच्या संदर्भात विनंती अर्ज सादर करणा-या मूळ विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव, जिल्हाधिकारी, यवतमाळ व अन्य अधिका-यांच्या दिनांक २९ मे, २०१७ व दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी साक्षी नोंदविल्या.

विनंती अर्जासंबंधी विभागाने पाठविलेली माहिती (परिशिष्ट दोन) तसेच साक्षीच्या वेळी समितीस मिळालेली अधिक माहिती याचा सर्वंकष विचार करून समितीने अहवाल तयार केला व दिनांक २० मार्च, २०१८ रोजीच्या बैठकीत संमत केला.

**विधान भवन** :
मुंबई,
दिनांक : २० मार्च २०१८.

**माणिकराव ठाकरे**
उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा,
समिती प्रमुख विनंती अर्ज समिती.

# अहवाल

मी विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा समिती प्रमुख, समितीच्या वतीने हा अहवाल सादर करीत आहे.

**" वैद्यनगर सिंधी कॉलनी, आर्णि रोड, यवतमाळ येथील विस्थापित लोकांचे पुनर्वसन करताना दिलेल्या भूखंडातील सत्ता प्रकार ब-२ चे वर्ग अ-१ मध्ये भोगवटादार म्हणून नोंद घेण्याबात "** या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. यांनी दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी दिली व दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजी प्रस्तुतचा विनंती-अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती-अर्ज त्याच दिवशी विनंती-अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात आला. (परिशिष्ट एक)

अर्जदारांनी विनंती अर्जात नमूद केले आहे की, जळगाव, धुळे व यवतमाळ जिल्ह्यातील विस्थापित सिंधी बांधवाच्या विस्थापितांना पुनर्वसनासाठी दिलेल्या भूखंडाचा ब-२ सत्ताप्रकार बदलून "अ" सत्ताप्रकार अभिलेखाची नोंद करण्याबाबत वारंवार जिल्हा प्रशासनाला कळवून सुद्धा सदरच्या विषयाबाबत कार्यवाही होत नाही.

निर्वासित वसाहती जमीन/मालमत्ता निर्वासित इसम (नुकसान भरपाई व पुनर्वसन) अधिनियम १९५४ व त्याअंतर्गत तयार केलेले नियमांने सदरच्या सिंधी बांधवांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहेत. संकोष मालमत्तेमधील (Compensation Pool Properties) भूखंड निर्वासित व्यक्तींना वितरित करण्यात आले होते. सदरच्या अधिनियमाचे बाबतची अंमलबजावणी विभागाने पुढाकार घेऊन सिंधी बांधवाना दिलासा देण्याबाबत विंनती अर्ज समितीतर्फे शिफारस करण्याबाबत मागणी विनंती अर्जात केलेली आहे.

समितीच्या दिनांक २९ मे, २०१७ रोजीच्या बैठकीच्या वेळी महसूल व वन (महसूल) विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट-दोन अ) मध्ये असे नमूद केले आहे की, १९४७ मधील फाळणीतील निर्वासित व्यक्तींना भरपाई संकोष मालमत्तेमधील वाटप करण्यात आलेल्या मिळकतीचा सत्ता प्रकार हा विविध ठिकाणी विविध प्रकारे उदा. ब,ब-२ इत्यादी नोंदविला गेला आहे. सदरहू धारणाधिकार "अ" असा करण्याबाबत जळगाव व धुळे जिल्ह्यातील मिळकत धारकांकडून प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने शासनाने अधिकार अभिलेखामध्ये अभिलिखित सत्ता प्रकाराचे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ मधील कलम २५८ अन्वये पुनर्विलोकन करण्याबाबत जिल्हाधिकारी, धुळे यांना शासनपत्र दिनांक २८/४/२००६, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना शासनपत्र दिनांक ३०/५/२००६ व दिनांक २४/६/२००८ च्या पत्रान्वये निदेश देण्यात आले होते. तसेच जळगाव जिल्ह्यातील वसाहती संदर्भात दिनांक १३/१/२०१० च्या पत्रान्वये

जिल्हाधिकारी जळगांव यांना अभिहस्तांतरण करारामध्ये (conveyance deed) विनिर्दिष्टपणे नमूद केलेल्या मिळकतींना/क्षेत्रास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ खालील कलम २० (२) अनुसार चौकशीची कार्यवाही करून अ-१ हा सत्ता प्रकार फक्त निवासी वापरासाठी लागू करण्यात यावा, असे निदेश काही अटी व शर्तीसही दिले आहेत.

जरीपटका, मेकोसाबाग, खामला, नागपूर व वैद्यनगर, यवतमाळ मिळकतीचा सत्ता प्रकार "ब-२" ऐवजी "अ" असा करण्याबाबत प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमिअभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक ११/१/२०१६ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. त्या वरून असे निदर्शनास येते की, विस्थापितांना देण्यात आलेल्या जमिनी विविध प्रकारच्या दस्तान्वये वितरित करण्यात आल्या असून उच्चतम किमतीची बोली बोलणा-या विस्थापितास जाहीर लिलावाव्दारे "फ्री होल्ड" स्वरूपात जमिनी दिलेली प्रकरणे वगळता काही प्रकरणी जाहीर लिलावाव्दारेच मात्र भाडेपट्टयावर जमिनी दिलेल्या आहेत. तसेच काही प्रकरणी जमिनीवरील केवळ इमारती भाडेपट्ट्याने दिलेल्या आढळतात, त्यामुळे या सर्व मालमत्ता या फ्री होल्ड स्वरूपाच्या नाहीत. अशा परिस्थितीत या मिळकतीचा सत्ता प्रकार बदलून तो "अ"असा करावयाचा झाल्यास त्याबाबत जाणीवपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत शासन स्तरावर त्याअनुषंगाने सखोल विचार करून धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू आहे.

प्रस्तावाधीन जमिनीचे वाटप महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ खालील नियंत्रित सत्ताप्रकाराने केल्याचे दिसून येते. जमिनीचे वाटप विस्थापित इसम (नुकसानभरपाई व पुनर्वसन) अधिनियम, १९५४ खाली झाल्याचे दिसून येत नाही. तसेच सन १९५१-५२ साली विस्थापित अधिनियम अस्तितत्वात नव्हता.

महाराष्ट्र राज्यामध्ये विस्तापितांच्या तीस ठिकाणी अशा वसाहती आहे. विस्थापित सिंधी बांधवाच्या पुनर्वसनासाठी दिलेल्या भूंखडाचा ब-याच ठिकाणी ब-२ तर काही ठिकाणी "ब" असा सत्ता प्रकार आहे. अशा प्रकारचे सत्ता प्रकार त्या त्या जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांनी लावले असून तशा पद्धतीने वाटप करण्यात आल्याचे दिसते. तसाच प्रकार यवतमाळ येथील विस्तापितांबाबत झालेला दिसतो. भारत-पाक फाळणी नंतर ज्या व्यक्ती भारतात आल्या तेव्हा त्यांना राहण्यासाठी जागा किंवा प्लॉट देण्यात यावी असा उद्देश होता. उपजिवीकेचे साधन असलेली जागा त्यांच्या मालकीची करून दिली जात नाही ही खेदाची बाब आहे. यासाठी ते अनेक वर्षापासून प्रयत्न करीत आहे, परंतु त्यांना न्याय मिळालेला नाही. सिंधी पचांयतीने ब-२ सत्ता प्रकार बदलून अ-१ सत्ता प्रकार करून सदरहू भूंखड त्यांच्या नावावर कसे करता येईल याकरिता प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्याला कायद्याचे स्वरूप देखील पाहिले पाहिजे. सन १९४७-४८ मध्ये भारत

पाकिस्तान फाळणी झाल्यानंतर काही सिंघी बांधवांनी पाकिस्तानात न राहता भारतात राहणे पसंद केले व भारतात स्थलांतरीत झाले.केंद्रशासनाने सेल डीड सारखी बाब करून ब्लॉक्स देण्यात आले होते. कन्व्हेयन्स डीड मध्ये असे लिहले होते की. “Deed of Conveyance of building constructed on lease-hold site sold otherwise than by public auction.” आमच्याकडून रूपये ४४३९ घेवून आम्हाला परचेसर म्हणून संबोधन्यात आले आहे याचाच अर्थ आम्ही हे ब्लॉक परचेस केले आहे. त्यामुळे आम्ही या ब्लॉकचे मालक आहोत तसेच महाराष्ट्र लॅड रेव्हयून्यूच्या सेक्शन २९ प्रमाणे जर ट्रांसपरेबल राईटस दिले जात असतील तर त्याला ॲक्युपन्सी क्लास १ देण्यात यावा “ The expression’purchaser’ use in present shall include in addition to the said his lawfull heirs, successors, representatives, assigngs, tranferies, lessees and any person or persons in occupation of the said property.” यामध्ये आम्हाला प्रॉपर्टी ट्रांसफर करण्याचे सुद्धा अधिकार दिलेले आहे. माननीय राष्ट्रपती यांचेद्वारे केंद्र सरकारनी ही कागदपत्रे १९६३ साली तयार करून दिली आहे. ही कागदपत्रे सेटलमेंट कमीशनर यांनी केलेली असून प्रेसिडेंट ऑफ इंडिया यांच्या आदेशाप्रमाणे करण्यात आले आहे. त्यामध्ये ट्रांसफरचे राईटस दिले आहे. अधिक्षक भूमी अभिलेख यांनी त्यांच्या अहवालात असे म्हटले आहे की विस्तापिताना सत्ता प्रकार “ अ ” द्यायला पाहिजे होता परंतू चूकीने “ ब ” देण्यात आला आहे. केवळ जळगाव जिल्ह्यातील “ ब ” सत्ताप्रकार “ अ ” सत्ताप्रकारामध्ये रूपांतरीत होवू शकतो तर इतर जिल्ह्यातील विस्तापितांवर अन्याय का हा मुद्दा असून आम्हालाही “ अ ” सत्ता प्रकार करून देण्यात यावा अशी आमची विनंती आहे.

सन १९७३ साली महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये “ ब ” सत्ताप्रकारामध्ये असलेल्या सिंधी वसाहतींचे “ अ ” सत्ताप्रकार देण्याचे दर्शविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये वैद्यनगर सिंधी कॉलनी यवतमाळ यांचा समावेश केला आहे. हे राजपत्र देखील दाखल केलेले आहेत. अधिक्षक भूमि निरिक्षक, नागपूर यांनी सन २०१० मध्ये अहवाल दिलेला आहे. ५०० रूपये आकारून आमच्या नावाने प्लॉट गर्व्हमेंट ऑफ सेंट्रल प्रॉव्हिन्स ॲन्ड बेरार (सीपी ॲन्ड बेरार). पूर्वी यवतमाळ सीपी ॲन्ड बेरार मध्ये येत होते. नंतर ते महाराष्ट्र मध्ये आले. सदरच्या विषयाबाबत महसूल व वन विभागाने वित्त विभागाशी चर्चा करावी परंतू राज्यातील एकत्रितपणे निर्णय घेताना त्यामध्ये यवतमाळचाही समावेश असावा. प्रस्तुत विषय मंत्रीमंडळाच्या बैठकीसमोर न्यावा व तीन महिन्याच्या आत समितीस पुढच्या बैठकीत अद्यावत माहितीसह उपस्थित रहावे असे समिती सुचवित आहे.

समितीच्या दिनांक २२ फेब्रुवारी २०१८ रोजीच्या बैठकीच्या वेळी महसूल व वन विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट-दोन ब) मध्ये असे नमूद केले आहे की, १९४७ मधील फाळणीतील निर्वासित व्यक्तींना भरपाई संकोष मालमत्तेमधील वाटप करण्यात आलेल्या मिळकतीचा सत्ता प्रकार

हा विविध ठिकाणी विविध प्रकारे उदा. ब, ब-२ इत्यादी नोंदविला गेला आहे. सदरहू धारणाधिकार " अ " असा करण्याबाबत जळगाव व धुळे जिल्ह्यातील मिळकत धारकांकडून प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने शासनाने अधिकार अभिलेखामध्ये अभिलिखित सत्ता प्रकाराचे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम २५८ अन्वये पुर्नविलोकन करण्याबाबत जिल्हाधिकारी, धुळे यांना शासन पत्र दिनांक २८ एप्रिल २००६, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना शासनपत्र दिनांक ३० मे २००६ व दिनांक २४ जून २००८ च्या पत्रान्वये निदेश देण्यात आले होते. तसेच जळगाव जिल्ह्यातील वसाहती संदर्भात दिनांक १३ जानेवारी २०१० च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी जळगांव यांना अभिहस्तांतरण करारामध्ये (conveyance deed) विनिर्दिष्टपणे नमूद केलेल्या मिळकतींना/क्षेत्रास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ खालील कलम २० (२) अनुसार चौकशीची कार्यवाही करून अ-१ हा सत्ता प्रकार फक्त निवासी वापरासाठी लागू करण्यात यावा, असे निदेश काही अटी व शर्तीसही दिले आहेत.

जरीपटका, मेकोसाबाग, खामला, नागपूर व वैद्यनगर, यवतमाळ मिळकतीचा सत्ता प्रकार " ब-२ " ऐवजी " अ " असा करण्याबाबत प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक ११ जानेवारी २०१६ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. त्यावरून असे निदर्शनास येते की, विस्थापितांना देण्यात आलेल्या जमिनी विविध प्रकारच्या दस्तान्वये वितरीत करण्यात आल्या असून उच्चतम किंमतीची बोली बोलणा-या विस्थापितास जाहीर लिलावद्वारे " फ्री होल्ड " स्वरूपात जमिनी दिलेली प्रकरणे वगळता काही प्रकरणी जाहीर लिलावाद्वारेच मात्र भाडेपट्ट्यावर जमिनी दिलेल्या आहेत. तसेच काही प्रकरणी जमिनीवरील केवळ इमारती भाडेपट्ट्याने दिलेल्या आढळतात, त्यामुळे या सर्व मालमत्ता या फ्री होल्ड स्वरूपाच्या नाहीत. अशा परिस्थितीत या मिळकतीचा सत्ता प्रकार बदलून तो " अ " असा करावयाचा झाल्यास त्याबाबत जाणीवपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत शासन स्तरावर त्याअनुषंगाने सखोल विचार करून धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू आहे.

प्रस्तावाधीन जमिनीचे वाटप महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ खालील नियंत्रित सत्ताप्रकाराने केल्याचे दिसून येते. जमिनीचे वाटप विस्थापित इसम (नुकसान भरपाई व पुनर्वसन) अधिनियम १९५४ खाली झाल्याचे दिसून येत नाही. तसेच सन १९५१-५२ साली विस्थापित अधिनियम अस्तित्वात नव्हता.

जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडून प्लॉट धारक विस्तापितांना देण्यात आलेल्या भूंखडाबाबत माहिती वाटपाबाबत आदेश, चलन, ताबा पावती इत्यादी कागदपत्रे नुकतीच प्राप्त झाली असून त्याची छाननी करण्यात येत आहे.

समितीने सदर विनंती अर्जाबाबत सद्यस्थितीत मागील बैठकीत विषयासंदर्भात विभागाकडे विचारणा केली असता समितीस पुढील माहिती दिली. यवतमाळ जिल्ह्यामध्ये शासनाकडून सदर मालमत्तांना फ्री होल्ड करता येईल काय याबबत सविस्तर अहवाल मागविला होता. जिल्हाधिकारी कार्यालयाने कुणाला किती प्लॉटचे वाटप त्या प्लॉटचे क्षेत्रफळ किती असा सविस्तर अहवाल पाठविला आहे. एकूण १९९ मिळकती आहे. त्यामध्ये बांधकामासह भाडेपट्ट्याने दिलेल्या ४८ मिळकती असून कब्जा हक्काने दिलेल्या मिळकती १२४ आहेत. त्याचप्रमाणे २७ प्लॉट अतिक्रमीत होते ते नियमीत प्रदान करण्यात आले आहेत. यवतमाळ जिल्ह्यापूरता हा विषय नसून यासाठी राज्यव्यापी निर्णय घ्यावा लागणार आहे. शासनाने शासकीय जमिनी रितसर भाडेपट्ट्यानी लोकांना दिलेल्या होत्या. शासनाने जमिनी कोणत्या तत्वावर व किती अधिमूल्य भरून घेवून आपण फ्री होल्ड मध्ये रूपांतरीत कराव्या जसे सिंधी बांधव यांच्या जमिनी फ्री होल्ड कन्हेट करण्याबाबत समायोजन आहे.

उपरोक्त अहवालाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झाल्यानुसार प्रत्येक लीज ची कागदपत्रे तपासणी करून त्यामध्ये म्हटल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व संबंधित विषय वित्त विभागाकडे पाठविण्यात येईल.

**अभिप्राय व शिफारशी :**

वैद्यनगर सिंधी कॉलनी, आर्णि रोड, यवतमाळ येथील विस्थापित लोकांचे पुनर्वसन करताना दिलेल्या भूखंडातील सत्ता प्रकार ब-२ चे वर्ग अ-१ मध्ये भोगवटादार म्हणून नोंद घेण्याबाबतचा विषय ब-याच वर्षापासून प्रलंबित आहे.राज्यामध्ये विस्थापितांच्या ३० ठिकाणी अशा वसाहती आहेत. विस्थापित सिंधी बांधवांच्या पुनर्वसनासाठी दिलेल्या भुखंडाचा ब-याच ठिकाणी ब-२ तर काही ठिकाणी " ब " असा सत्ता प्रकार आहे. अशा प्रकारचे सत्ता प्रकार त्या त्या जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांनी लावले असले व ते तशा पद्धतीने वाटप करण्यात आल्याचे दिसते. तसाच प्रकार यवतमाळ येथील सिंधी विस्थापितांबाबत झालेला दिसतो. वेगवेगळ्या जिल्ह्यातील भुखंडामध्ये सारखेपणा नाही. भारत-पाकिस्तान फाळणीनंतर या व्यक्ती भारतात आल्या तेव्हा त्यांना राहण्यासाठी जागा देण्यात यावी, प्लॉट देण्यात यावे, असा उद्देश होता. परंतु आज त्यांच्या उपजिविकेचे साधन असलेली जागा त्यांच्या मालकिची करून दिली जात नाही, ही खेदाची बाब आहे.

धुळे आणि जळगाव या दोन जिल्ह्यामध्ये या सिंधी बांधवांना शासनाने कम्पनसेशन पुलमधून ज्या मालमत्ता दिलेल्या आहेत, त्यासंदर्भात शासनाकडून काही सूचना देण्यात आल्या होत्या. त्यामध्ये काही ठिकाणी " ब " सत्ता प्रकार असेल तर त्याला पुनर्विलोकन करून तिथे " अ " सत्ता प्रकार लागू करण्याची कारवाई करण्यात यावी, अशा प्रकारच्या सूचना राज्य शासनाने यापूर्वी

दिलेल्या होत्या. त्याआधारे इतरत्र जर अशा प्रकाराच्या कम्पनसेशन पुल मालमत्तांमधून जर अशा प्रकारची मालमत्ता सिंधी बांधवाना देण्यात आलेली असेल तर त्यांना समान न्याय दिला पाहिजे. ज्यामुळे त्यांचे पुनर्विलोकन करून त्या ठिकाणी "अ" सत्ता प्रकार केला पाहिजे. या अनुषंगाने विभागाला सदर विषय हा राज्यव्यापी असल्यामुळे याबाबत प्रस्ताव तयार केला आहे. सदर प्रस्ताव वित्त विभागाला सादर करण्यात आलेला आहे. वित्त विभागाने सदर प्रस्तावामध्ये त्रुटी काढल्या होत्या. त्यानंतर त्रुटीची पूर्तता करून वित्त विभागाने महसूल विभागाकडे सदर प्रस्ताव पाठविला होता. सदरहू त्रुटींची पूर्तता करून वित्त विभागाला पुन्हा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. वित्त विभागाने सदर प्रस्तावाला मंजुरी दिल्यानंतर शासनाने आदेश प्राप्त करून घेण्यात येतील असे समितीस सांगण्यात आले.

समितीला पाठविलेल्या माहितीत १९४७ मधील फाळणीतील निर्वासित व्यक्तींना भरपाई संकोष मालमत्तेमधील वाटप करण्यात आलेल्या मिळकतीचा सत्ता प्रकार हा विविध ठिकाणी विविध प्रकारे उदा. ब, ब-२ इत्यादी नोंदविला गेला आहे. सदरहू धारणाधिकार "अ" असा करण्याबाबत जळगाव व धुळे जिल्ह्यातील मिळकत धारकांकडून प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने शासनाने अधिकार अभिलेखामध्ये अभिलिखित सत्ता प्रकाराचे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ मधील कलम २५८ अन्वये पुनर्विलोकन करण्याबाबत जिल्हाधिकारी, धुळे यांना शासनपत्र दिनांक २८/४/२००६, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना शासनपत्र दिनांक ३०/५/२००६ व दिनांक २४/६/२००८ च्या पत्रान्वये निदेश देण्यात आले होते. तसेच जळगाव जिल्ह्यातील वसाहती संदर्भात दिनांक १३/१/२०१० च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी जळगांव यांना अभिहस्तांतरण करारामध्ये (conveyance deed) विनिर्दिष्टपणे नमूद केलेल्या मिळकतींना/ क्षेत्रास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ खालील कलम २० (२) अनुसार चौकशीची कार्यवाही करून अ-१ हा सत्ता प्रकार फक्त निवासी वापरासाठी लागू करण्यात यावा, असे निदेश काही अटी व शर्तीसहीत दिले आहेत. समितीला आश्वासीत केल्याप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६० च्या कलम २५८ अन्वये अवलोकन करण्यासंदर्भात व कलम २० (२) अनुसार सर्व संबंधित मिळकीत/क्षेत्राच्या चौकशी करून समितीला कळविल्यानुसार कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

जरीपटका, मेकोसाबाग, खामला, नागपूर व वैद्यनगर, यवतमाळ मिळकतीचा सत्ता प्रकार "ब-२" ऐवजी "अ" असा करण्याबाबत प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक ११/१/२०१६ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. त्या वरून असे निदर्शनास येते की, विस्थापितांना देण्यात आलेल्या जमिनी विविध प्रकारच्या दस्तान्वये वितरीत करण्यात आल्या असून उच्चतम किंमतीची बोली बोलणा-या

विस्थापितास जाहीर लिलाद्वारे “ फ्री होल्ड ” स्वरूपात जमिनी दिलेली प्रकरणे वगळता काही प्रकरणी जाहीर लिलावाव्दारेच मात्र भाडेपट्टयावर जमिनी दिलेल्या आहेत. तसेच काही प्रकरणी जमिनीवरील केवळ इमारती भाडेपट्टयाने दिलेल्या आढळतात, त्यामुळे या सर्व मालमत्ता या फ्री होल्ड स्वरूपाच्या नाहीत. अशा परिस्थितीत या मिळकतीचा सत्ता प्रकार बदलून तो “ अ ” असा करावयाचा झाल्यास त्याबाबत जाणीवपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत शासन स्तरावर त्याअनुषंगाने सखोल विचार करून धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू आहे. **सदरची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यासंदर्भात संबंधित विभागांनी शासनाकडे पाठपुरावा करावा व समितीला कळविल्याप्रमाणे धोरणात्मक निर्णय घेण्यासंदर्भात शासनाने त्वरेने कार्यवाही करावी अशीही समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिण्यात पाठविण्यात यावी.**

शासनाकडून सर्वसाधारणपणे ज्या वर्ग २ च्या किंवा लिज होल्ड जमिनी देण्यात आलेल्या आहेत, त्यांना फ्रि होल्ड करण्यासाठी काय तत्व असावे व किती प्रिमियम आकारण्यात यावा या संदर्भात शासनाने एक समिती स्थापन केली होती. त्या समितीचा अहवाल अंतिम होत आलेला आहे. तो शासनाला या महिन्यामध्ये सादर केला जाणार आहे.त्यानंतर तो मार्च महिन्यामध्ये मंत्रीमडळ बैठकीपुढे जाईल. सुरू अहवाल सिंधी निर्वासितांपुरता नसून तो सर्वसामान्य लोकांकरिता आहे. त्यामध्ये जनरल तत्व दिलेले आहे की. शासनाने कोणतीही लिज होल्ड जमीन दिलेली असेल. तर किती पैसे प्राप्त करून, किती प्रिमियम भरून घेऊन आपण तिला फ्रि होल्डमध्ये कन्व्हर्ट करू शकतो किंवा जर कब्जेहक्काने दिली असेल, अथवा भोगवटदार वर्ग २ तत्वावर दिली असेत तर किती पैशांचा प्रिमियम आकारून आपण तिला फ्रि होल्डमध्ये कन्व्हर्ट करू शकतो, याबद्दलचे सर्वसाधारण तत्व त्या अहवालामध्ये अंतर्भुत आहेत. उक्त अहवालाच्या आधारावर जो निर्णय होणार आहे तो सर्व प्रकारच्या जमिनींना लागू होणार आहे असे सचिवांनी विदित केले. शासनाकडून उक्त निर्णय घेतल्यानंतर वैद्यनगर सिंधी कॉलनी, आर्णि रोड, यवतमाळ येथील **सिंधी बांधवाना देण्यात आलेल्या भूखंडाची भोगवटदार-२ चे भोगवटदार -१ म्हणून लवकरात लवकर नोंद करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्याच्या आत या समितीला कळविण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट-एक

## मूळ विनंती अर्ज

रामहरी रुपनवर
वि.प.स.

महाराष्ट्र विधानपरिषद

**प्रति :**

**मा. सभापती,**
महाराष्ट्र विधानपरिषद,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

**विषय :- वैद्यनगर सिंधी कॉलनी. आणि रोड, यवतमाळ मधिल विस्थापित लोकांचे पुनर्वसन करताना दिलेल्या भूखंडातील सत्ता प्रकार ब-२ चे वर्ग अ-१ मध्ये भोगवटदार म्हणून नोंद घेण्याबाबत...**

**मा. महोदय,**

जळगांव, धुळे व यवतमाळ जिल्हयातील विस्थापित सिंधी बांधवाच्या विस्थापितांना पुनर्वसनासाठी दिलेल्या भुखंडाचा ब-२ सत्ता प्रकार बदलुन "अ" सत्ता प्रकार अभिलेखाची नोंद करण्याबाबत वारंवार जिल्हा प्रशासनाला कळवून सुध्दा सदरच्या विषयाबाबत कार्यवाही होत नाही.

निर्वासित वसाहती जमीन/मालमत्ता निर्वासित इसम (नुकसान भरपाई व पुनर्वसन) अधिनियम १९५४ व त्या अंतर्गत तयार केलेले नियमांने सदरच्या सिंधी बांधवांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे.

संकोष मालमत्तेमधील (compensation pool properties) भुखंड निर्वासित व्यक्तिंना वितरीत करण्यात आले होते.

सदरच्या अधिनियामचे बाबतची अंमलबजावणी महसुल व वन विभागाने पुढाकार घेऊन सिंधी बांधवाना दिलासा देण्याबाबत विनंती अर्ज समिती तर्फे आपल्या शिफारशी सह करण्यात यावी. ही विनंती.

आपला,
( रामहरी रुपनवर )

मा. सभापती यांचे सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद
विधान भवन, मुंबई

सभापती
महाराष्ट्र विधानपरिषद

प्रति :

मा. सभापती,
महाराष्ट्र विधानपरिषद,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

**विषय :- वैद्यनगर सिंधी कॉलनी. आर्णि रोड, यवतमाळ मधिल विस्थापित लोकांचे पुनर्वसन करताना दिलेल्या भूखंडातील सत्ता प्रकार ब-२ चे वर्ग अ-१ मध्ये भोगवटदार म्हणून नोंद घेण्याबाबत...**

**मा. महोदय,**

जळगांव, धुळे व यवतमाळ जिल्हयातील विस्थापित सिंधी बांधवाच्या विस्थापितांना पुनर्वसनासाठी दिलेल्या भुखंडाचा ब-२ सत्ता प्रकार बदलुन "अ" सत्ता प्रकार अभिलेखाची नोंद करण्याबाबत वारंवार जिल्हा प्रशासनाला कळवून सुध्दा सदरच्या विषयाबाबत कार्यवाही होत नाही.

निर्वासित वसाहती जमीन/मालमत्ता निर्वासित इसम (नुकसान भरपाई व पुनर्वसन) अधिनियम १९५४ व त्या अंतर्गत तयार केलेले नियमांने सदरच्या सिंधी बांधवांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे.

संकोष मालमत्तेमधील (compensation pool properties) भुखंड निर्वासित व्यक्तिना वितरीत करण्यात आले होते.

सदरच्या अधिनियामचे बाबतची अंमलबजावणी महसुल व वन विभागाने पुढाकार घेऊन सिंधी बांधवाना दिलासा देण्याबाबत विनंती अर्ज समिती तर्फे आपल्या शिफारशी सह करण्यात यावी. ही विनंती.

आपला,

( रामहरी रुपनवर )

॥ ॐ ॥

सेवा परमो धर्म



# वैद्य नगर पूज्य सिन्धी पंचायत

कंवर नगर, आर्णि रोड, यवतमाल - ४४५००१ (म.रा.)

॥ अध्यक्ष ॥ तुलशीदास दीपचंद रतनानी ✆ -२४४९३१ (दु) २४४१०५ (नि)

॥ सचिव ॥ गोपीदास परशराम छत्तानी ✆ -२५१९१३ (दु) २४७३४२ (नि) मोबा - ९४२०५५१२७७

॥ उपाध्यक्ष ॥ खियाराम कृपालदास बतरा ✆ -२४१७६० (दु) २२४५४०३ (नि)

॥ उपाध्यक्ष ॥ नानिकराम बगाई मो - ९३२५१३८४९

॥ जनसंपर्क अधिकारी ॥ [illegible]कमदास बजाज ✆ -२४६०५३ (दु) २४३११५ (नि)

॥ सहसचिव ॥ मनोहरलाल तिलवानी ✆ -२४४७०३ (नि) मोबा -९८२२६९४३८५

॥ कोषाध्यक्ष ॥ सुरेंद्रकुमार होतवानी ✆ -२४६०६६ (दु) २४६२२६ (नि)

॥ कार्यकारिणी सदस्य ॥

[illegible]तमदास केशवानी
जगतराम छत्तानी
भीमसेन बतरा
आनंदराम हेमनानी
मनोहरलाल उदासी
मदनलाल रतनानी
घनश्यामदास कटियारा
मनोहरलाल छत्तानी
खुशालदास उदासी
जवाहरलाल तलवार
जगतराय धामेजानी
मोहनलाल नचवानी
शंकरलाल होतवानी
अशोककुमार तलरेजा
गिरधारीलाल बैसानी
लालचंद बतरा

जा.क्र. .................. दिनांक ४-१२-२०१८

प्रति,

आदरणीय ना.श्री.माणिकरावजी ठाकरे
उपसभापती विधान परिषद, महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई-३२

विषय :- वैद्यनगर सिंधी कॉलनी मधील विस्थापित लोकांचे पुनर्वसन करतांना दिलेल्या भूखंडातील सत्ता प्रकार ब-२ चे वर्ग अ-१ मध्ये भोगवटदार म्हणून नोंद घेण्याबाबत.

संदर्भ :- महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र.[illegible] व्हीआयपी/ २००७/ल दिनांक २४/२/२००८

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने विनंती करण्यात [illegible] यापूर्वी वेळोवेळी आम्ही लोकांनी वैद्यनगर येथील सिंधी [illegible] लोकांना राहण्याकरीता दिलेल्या भुखंडाचा सत्ता प्रकार (भोगवटदार वर्ग) ब-२ बदलवून अ-१ सत्ता प्रकार करुन कायमस्वरुपी भुखंड देण्याकरीता वेळोवेळी संबंधीत कार्यालयांना विनंती केलेली आहे. याबाबत शासनाने सुध्दा निर्देश देऊनही संबंधीत कार्यालयांनी आतापावेतो काहीही कार्यवाही केली नाही.

तरी वरील विषयाबाबत आपणास पुनःश्च या विनंती अर्जाद्वारे विनंती करण्यात येते की, योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश संबंधीतांना दयावेत ही नम्र विनंती.

सहपत्र :- ४

आपला विश्वासू,

अध्यक्ष सचिव
वैद्यनगर पूज्य सिंधी पंचायत,
कंवरनगर, यवतमाळ

एचबी ३३४८—२अ

क्रमांक ०/१५/व्हीआयपी/२००७/ल

महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २४ जून, २००८

प्रति,

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**<u>विषय:-</u> जळगांव जिल्ह्यातील सिंधी कॉलनीमधील सिंधी समाजाचे विस्थापनासाठी पुनर्वसन करतांना दिलेल्या भुखंडाचे सर्व्हेक्षण करतांना 'ब २' सत्ता प्रकार दिल्याबाबत सर्व्हेक्षणाची कार्यवाही तपासणेबाबत.**

महोदय,

जळगांव जिल्ह्यातील श्री. नानकदास धरमदास काबना व श्री. ठाकूरदास धरमदास काबना यांनी जळगांव मध्ये सिंधी कॉलनीमधील सिंधी समाजाच्या विस्थापितांची पुनर्वसनासाठी दिलेल्या भुखंडाचा 'ब २' सत्ता प्रकार बदलून 'अ' सत्ता प्रकार अभिलेखात नोंद करण्याविषयी दिनांक ३०/०४/२००७ अन्वये अपर मुख्य सचिव (महसूल) यांना उद्देशून निवेदन सादर केलेले आहे. सदर धारकांच्या निवेदनाच्या अनुषंगाने मा. आमदार श्री. गुरुनाथ जगवानी यांनी नागरिकांचा जिव्हाळयाचा प्रश्न असल्याने प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन नागरिकांना न्याय देण्याची विनंती केलेली आहे. उपरोक्त धारकांनी निवेदनात असे नमूद केले आहे की, हा केवळ जळगांव जिल्ह्यातील विस्थापितांचा प्रश्न नसून राज्यातील १३ जिल्ह्यातील सिंधी बांधवांच्या विस्थापितांचा प्रश्न असल्याचे नमूद केलेले आहे. (निवेदनाची प्रत सहपत्रासह सोबत जोडलेली आहे.)

२. सन १९४७ साली भारत पाकिस्तान फाळणीनंतर पश्चिम पाकिस्तानातील निर्वासितांना भारतामध्ये आश्रय द्यावा लागला. अशा निर्वासित व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी महाराष्ट्रात एकुण ३० ठिकाणी निर्वासित वसाहती उभारण्यात आल्या. या निर्वासित वसाहतीमध्ये जमिन/मालमत्ता निर्वासित इसम (नुकसान भरपाई व पुनर्वसन) अधिनियम, १९५४ व त्या अंतर्गत तयार केलेले नियमांचे आधारे लिलावाने अथवा अशा निर्वासित व्यक्तींनी त्यांच्या पश्चिम पाकिस्तानात सोडून दिलेल्या मालमत्तेच्या बदल्यात भरपाई संकोष मालमत्तेमधील (Compensation Pool Properties) भुखंड, निर्वासित व्यक्तींना वितरीत करण्यात आले होते. या मालमत्ते संदर्भातील तरतूदी ज्या अधिनियमात आहेत, तो अधिनियम महसूल व वन विभागाच्या पुनर्वसन कक्षाकडून हाताळला जातो.

३. पार्तव, या मालमत्तेच्या संदर्भात हस्तांतरणावर काही निर्बंध आहेत काय, ही बाब पुनर्वसन कक्षाकडून तपासून घेण्यात आली. पुनर्वसन कक्षात असे स्पष्ट केले की, उक्त अधिनियमांच्या कलम २० मधील तरतूदीनुसार भरपाई संकोष मालमत्तेमधील (Compensation Pool Properties) भुखंडाचे वितरण करण्याचे अधिकार उपविभागीय अधिकारी/तहसिलदार यांना व्यवस्थापकिय अधिकारी (Managing Officer) या नात्याने आहेत. अशा मालमत्तेचे वितरण मालकी हक्काने तसेच कोणत्याही अटी/शर्ती अथवा करारनाम्याशिवाय निवासी/वाणिज्यिक

प्रयोजनार्थ निर्वासित व्यक्तीस करण्यात येत असल्याने अशा जमिनी बोजेविरहीत (Freehold) स्वरुपाच्या खाजगी मालमत्ता ठरतात व अशा जमिनीच्या धारकांना भोगवटदार वर्ग-१ संबोधले जाते.

अशा निर्वासित वसाहतीमधील भरपाई संकोष मालमत्तेवरिल (Compensation Pool Properties) विसंवर्गात केली जाणारी अतिक्रमणे देखील नियमानुकूल करता येतात व अशा प्रकरणातील धारकांनाही भोगवटदार वर्ग-१ असे समजले जाते.

४. पुनर्वसन कक्षाने पुढे असेही स्पष्ट केले आहे की, प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन करतांना, प्रदान केलेल्या मालमत्ता व निर्वासित व्यक्ती (नुकसान भरपाई व पुनर्वसन) अधिनियम १९५४ अंतर्गत तयार करण्यात आलेल्या भरपाई संकोष मालमत्तेमधून (Compensation Pool Properties) वितरीत केलेल्या मालमत्ता यामध्ये मुलभूत फरक असून प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन अधिनियमांतर्गत प्रदान करण्यात आलेल्या जमिनीबाबतच्या तरतूदी निर्वासित व्यक्तींना वितरीत करण्यात आलेल्या भुखंडाच्या संदर्भात लागू करता येत नाहीत. या कारणास्तव भरपाई संकोष मालमत्तेमधून (Compensation Pool Properties) वितरित केलेल्या भुखंडाच्या संदर्भात अथवा अशा मालमत्तेवरिल अतिक्रमणे निर्वासित व्यक्तींच्या लाभात नियमानुकूल करुन दिल्यानंतर अशाही भुखंडाच्या संदर्भात त्यांना भोगवटदार वर्ग-२ अथवा ब/ब-२ सत्ता प्रकाराने मालमत्ता धारण करणारे मालमत्ता धारक अशा नोंदी अधिकार अभिलिखित करण्याच्या क्षेत्रीय महसूल अधिका-यांचा निर्णय योग्य नसून अशा निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता असल्याचे अभिप्राय पुनर्वसन कक्षाने दिले आहेत.

५. या संदर्भात नमूद करण्यात येते की, धुळे जिल्ह्यातील कुमारनगर भागातील सिंधी कॉलनीतील विस्थापितांच्या निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडील प्रस्तावाच्या संदर्भाने या विभागाच्या पुनर्वसन कक्षाचे अभिप्राय कक्षात घेऊन, निर्वासित व्यक्ती (नुकसान भरपाई व पुनर्वसन) अधिनियम १९५४ व त्या अंतर्गत तयार केलेले नियम, १९५५ मधील तरतुदी लक्षात घेऊन सदरच्या भागातील भरपाई संकोष मालमत्तेमधून (Compensation Pool Properties) वितरित केलेल्या भुखंडाच्या संदर्भात अथवा अशा मालमत्तेवरील अतिक्रमण नियमानुकूल करुन दिल्यानंतर धारण केलेल्या भुखंडा संदर्भात अधिकार अभिलेखामध्ये अभिलिखित सत्ता प्रकाराचे महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम २५८ अन्वये पुनर्विलोकन करण्याबाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हाधिकारी धुळे यांना शासन पत्र दिनांक ३०/०५/२००६ च्या पत्रान्वये निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार नगर भूमापन अधिकारी, धुळे यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येते.

मा. आमदार श्री. गुरुनाथ जगवानी व जळगांव जिल्ह्यातील सिंधी कॉलनीतील धारकांनी वरील निवेदनाद्वारे शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, सिंधी वसाहतीतील धारकांना भारत सरकार कडून मिळकत खरेदी हक्काने प्राप्त झालेली आहे. नगर भूमापन चौकशीवेळी सिंधी वसाहतीतील भरपाई संकोष मालमत्तेमधून (Compensation Pool Properties) निर्वासितांना वितरित केलेल्या भुखंडा संदर्भात 'ब' सत्ता प्रकार हा चुकीचा दाखल झाला आहे असे निवेदनात नमूद केलेले आहे.

६. उपरोक्त नमूद धारकाने हा केवळ जळगाव जिल्ह्यातील सिंधी विस्थापितांचा प्रश्न नसून, राज्यातील १३ जिल्ह्यातील सिंधी विस्थापितांचा हा प्रश्न आहे. पश्चिम पाकिस्तानातुन निर्वासित झालेल्या सिंधी समाजाच्या विस्थापनासाठी राज्य शासनाने दिनांक २४/०१/१९७३ च्या अधिसुचने नुसार एकुण ३० वसाहती स्थापन केलेल्या आहेत. पैकी शासने दिनांक ३०/०५/२००६ च्या पत्रात धुळे जिल्ह्यातील कुमारनगर भागातील सिंधी वसाहतीच्या जमिनीबाबत जिल्हाधिकारी, धुळे यांच्या परस्तावानुसार चौकशीमध्ये दाखल याचा प्रकार पुनर्विलोकित करण्यासाठी आपल्या कार्यालयास कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार आपल्या कार्यालयाकडून कार्यवाही पूर्ण झालेली असावी अशी धारणा आहे. दिनांक २४/०१/१९७३ च्या अधिसूचनेची प्रत तसेच दिनांक ३०/०५/२००६ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे. जळगांव जिल्ह्यातील सिंधी कॉलनीसह उर्वरित २९ वसाहतीमध्ये धारकाच्या सत्ता प्रकार नगर भूमापन चौकशीवेळी 'ब' असा चुकिचा नोंदविला गेला असल्यास या संदर्भातील पुनर्वसन कक्षाचे अभिप्राय लक्षात घेऊन कागदपत्रे पडताळून योग्य अधिकृत कायदेशिर कागदपत्रांच्या आधारे प्रकरणी पुनर्विलोकन करण्यात यावे.

७. उपरोक्त परिच्छेदामध्ये नमूद केल्यानुसार अशा प्रकरणामध्ये नगर भूमापन प्रयोजनेवेळी झालेल्या चौकशीमध्ये मिळकतीच्या अभिलेखात सत्ता प्रकार चुकीचा दाखल करण्यात आला असल्यास त्याबाबत भूमि अभिलेख विभागाकडून तपासणीची/पुनर्विलोकनाची कार्यवाही होणे आवश्यक ठरते. यास्तव प्रस्तावाधीन जळगांव जिह्यातील सिंधी कॉलनीमधील विस्थापितांच्या मिळकतीसह राज्यातील अन्य सिंधी वसाहतीमधील भरपाई संकोष मालमत्तेमधून (Compensation Pool Properties) वितरीत करण्यात आलेल्या भूखंडा संदर्भात अथवा अशा मालमत्तेवरील अतिक्रमणे नियमानुकूल करुन दिल्यांवर धारण केलेल्या भूखंडा संदर्भात चौकशीवेळी संबंधित क्षेत्रीय अधिका-याकडून पुनर्विलोकन करण्यात यावे व कार्यवाहीचा अहवाल शासनास पाठविण्यात यावा अशी विनंती आहे.

आपला विश्वासू

सोबत:- वरिल प्रमाणे

(ता.मा. कोळेकर)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

<u>प्रत आवश्यक त्या शीघ्र कार्यवाहीसाठी अग्रेषित.</u>

१) सर्व विभागीय आयुक्त.

२) जिल्हाधिकारी नागपूर, यवतमाळ, अकोला, अमरावती, कोल्हापूर, अहमदनगर, पुणे, नंदुरबार, जळगांव, धुळे, नाशिक, मुंबई उपनगर, ठाणे.

[illegible]
क्र. भू. [illegible]
अमरावती. दिनांक [illegible]

प्रति,

जिल्हा अधीक्षक भुमि अभिलेख ,
यवतमाळ

विषय - यवतमाळ शहरातील सिंधी कॉलनी मधील सिंधी विस्थापनासाठी पुर्नवसन करतांना दिलेल्या भुखंडाचे सर्वेक्षण करतांना ब-२ सत्ताप्रकार दिल्याबाबत सर्वेक्षणाची कारवाही करण्याबाबत.

संदर्भ - नंदिनी निलेश देशमुख पारवेकर आमदार यवतमाळ यांचा दिनांक १४/०८/२०१४ रोजीचा अर्ज.

वरील संदर्भीय पत्रान्वये विनंती करण्यात येते की महाराष्ट्रातील धुळे व जळगाव जिल्ह्यातील वरील विषयाबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे. यवतमाळ व इतर जिल्ह्यातील सिंधी समाजाच्या विस्थापणासाठी पुर्नवसन करतांना दिलेल्या भुखंडाचे सर्वेक्षण करतांना ब-२ सत्ता प्रकार दिल्याबाबतचे सर्वेक्षण कारवाही अती शिघ्र करण्याबाबतचे आदेश मा. जिल्हाधिकारी, भूमि अभिलेख कार्यालय यांना विनंती पत्र देवून सुध्दा काहीच कार्यवाही झालेली नाही. पत्रासोबत शासनाचे आदेश क्र. १५/व्हीआयपी/२००६/दि. २४/०६/२००८ सोबत जोडलेले आहे असे तक्रार अर्जात नमूद केले आहे.

याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन इकडे ७ दिवसाच्या आत अहवाल सादर तरी तक्रारदार यांनी उपस्थीत केलेल्या मुद्दयावर नियमानुसार कार्यवाही करुन तक्रारदार यांना आपण आपले स्थरावर समर्पक उत्तराने कळवुन त्याबाबत आपण आपले अभिप्राय व आवश्यक त्या कागदपत्रासह स्वंयस्पष्ट अहवाल ईकडील कार्यालयात ७ दिवसाच्या आत सादर करावा विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी.

239

( आर. जी. लव्हाळे )
उपसंचालक भुमी अभिलेख
अमरावती प्रदेश, अमरावती.

प्रतिलिपी :- मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे यांना माहीतीस सविनय सादर.
प्रत:- उप अधीक्षक भुमि अभिलेख, यवतमाळ यांना माहितीस रवाना.
प्रत:- मा. नंदिनी निलेश देशमुख पारवेकर आमदार यवतमाळ यांना माहीतीस सविनय सादर.

# परिशिष्ट - दोन

## विभागाने सादर केलेली माहिती

(शा.म.मु.) एचबी ३१४८–३ (३५०—३-२०१८)

परिशिष्ट—दोन अ

**महाराष्ट्र शासन**

पत्र क्र.-जमीन-४७१७/प्र.क्र.०२/ज-१,
महसूल व वन विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक-२६/०५/२०१७.

प्रति,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय,
विधानभवन, मुंबई-३२.

**विषय:- जमीन- यवतमाळ.**
वैधनगर, जि. यवतमाळ येथील सिंधी समाजाच्या विस्थापनांची
पुनर्वसनासाठी दिलेल्या भुखंडाच्या ब-२ सत्ताप्रकार (भोगवटदार वर्ग)
बदलून सत्ताप्रकार "अ" करण्याबाबत...
अॅड. रामहरी रुपनवर, विधानपरिषद सदस्य यांचा विनंती अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयावरील आपल्या कार्यालयाचे पत्र क्र. १४९७८/म.वि.स./विपविअस/ड-९, दि. २३/०५/२०१७ च्या पत्रास अनुसरून सोमवार, दि.२९/०५/२०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेल्या बैठकीसाठी अॅड. रामहरी रुपनवर, विधानपरिषद सदस्य यांच्या अर्जावर महसूल विभागाच्या अहवालाच्या ४० प्रती सोबत पाठवित आहे.

आपला
२६/५/१७
( चं. नि. पाडळे )
अवर सचिव, महसूल व वन विभाग.

सोबत - वरीलप्रमाणे.

प्रत-

उप सचिव, कार्यासन म-८, ज-१, ल-१, र-६, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना सहपत्राच्या प्रतीसह अग्रेषित.

**परिशिष्ट - एक**
म. व व. वि. / ज-९

**विषय:- जमीन- यवतमाळ.**
वैद्यनगर, जि. यवतमाळ येथील सिंधी समाजाच्या विस्थापनांची पुनर्वसनासाठी दिलेल्या भुखंडाच्या ब-२ सत्ताप्रकार (भोगवटदार वर्ग) बदलून सत्ताप्रकार "अ" करण्याबाबत विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक-.....
मा. ॲड. रामहरी रुपनवर, विधानपरिषद सदस्य यांचा दिनांक निरंकचा विनंती अर्ज.

**मुद्दा क्र. १**

जळगाव, धुळे व यवतमाळ जिल्ह्यातील विस्थापित सिंधी बांधवांच्या विस्थापितांना पुनर्वसनासाठी दिलेल्या भुखंडाचा "ब-२" सत्ताप्रकार बदलुन "अ" सत्ताप्रकार अभिलेखाची नोंद करण्याबाबत वारंवार जिल्हा प्रशासनला कळवुन सुध्दा सदरच्या विषयावर कार्यवाही न होण्याबाबत.

**विभागाचा अहवाल:-**

१९४७ मधील फाळणीतील निर्वासित व्यक्तींना भरपाई संकोष मालमत्तेमधील वाटप करण्यात आलेल्या मिळकतींचा सत्ता प्रकार हा विविध ठिकाणी विविध प्रकारे उदा. ब, ब-२ इत्यादी नोंदविला गेला आहे. सदरहू धारणाधिकार "अ" असा करण्याबाबत जळगांव व धुळे जिल्ह्यातील मिळकत धारकांकडून प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने शासनाने अधिकार अभिलेखामध्ये अभिलिखित सत्ता प्रकाराचे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम २५८ अन्वये पुर्नविलोकन करण्याबाबत जिल्हाधिकारी, धुळे यांना शासनपत्र दिनांक २८/०४/२००६, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना शासनपत्र दिनांक ३०/०५/२००६ व दिनांक २४/०६/२००८ च्या पत्रांन्वये निदेश देण्यात आले होते. तसेच, जळगांव जिल्ह्यातील वसाहतीं संदर्भात दि. १३/०१/२०१० च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, जळगांव यांना अभिहस्तांतरण करारामध्ये (Conveyance deed) विनिर्दिष्टपणे नमूद केलेल्या मिळकतींना / क्षेत्रास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ खालील कलम २० (२) अनुसार चौकशीची कार्यवाही करुन अ-१ हा सत्ता प्रकार फक्त निवासी वापरासाठी लागू करण्यात यावा, असे निदेश काही अटी व शर्तीसह दिले आहेत.

जरीपटका, मेकोसाबाग, खामला, नागपूर व वैद्यनगर, यवतमाळ मिळकतींचा सत्ता प्रकार "ब-२" ऐवजी "अ" असा करण्याबाबत प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. ११/०१/२०१६ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. त्या वरुन असे निदर्शनास येते की, विस्थापितांना देण्यात आलेल्या जमिनी विविध प्रकारच्या दस्तान्वये वितरीत करण्यात आल्या असून उच्चतम किंमतीची बोली बोलणा-या विस्थापितास जाहीर लिलावाद्वारे "फ्री होल्ड" स्वरुपात जमिनी दिलेली प्रकरणे वगळता काही प्रकरणी जाहीर लिलावाद्वारेच मात्र भाडेपट्ट्यावर जमिनी दिलेल्या आहेत. तसेच काही प्रकरणी जमिनीवरील केवळ इमारती भाडेपट्ट्याने दिलेल्या आढळतात. त्यामुळे या सर्व मालमत्ता

या फ्री होल्ड स्वरुपाच्या नाहीत. अशा परिस्थितीत या मिळकतींचा सत्ता प्रकार बदलून तो "अ" असा करावयाचा झाल्यास त्याबाबत जाणीवपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत शासन स्तरावर त्यानुषंगाने सखोल विचार करुन धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे.

**मुद्दा क्र.२-**

निर्वासित वसाहती जमीन/ मालमत्ता निर्वासित इसम (नुकसान भरपाई व पुनर्वसन) अधिनियम १९५४ व त्या अंतर्गत तयार केलेल्या नियमाने सदरच्या सिंधी बांधवांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे. तसेच संकोष मालमत्तेमधील भुखंड निर्वासित व्यक्तींना वितरित करण्यात आले होते. या अधिनियमाबाबतची अंमलबजावणी महसूल व वन विभागाने पुढाकार घेऊन सिंधी बांधवांना दिलासा देण्यात यावा.

**विभागाचा अहवाल:-**

प्रस्तावाधीन जमिनीचे वाटप महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे), नियम १९७१ खालील नियंत्रित सत्ताप्रकाराने केल्याचे दिसून येते. जमिनीचे वाटप विस्थापित इसम (नुकसान भरपाई व पुनर्वसन ) अधिनियम १९५४ खाली झाल्याचे दिसून येत नाही. तसेच सन १९५१-५२ साली विस्थापित अधिनियम अस्तित्वात नव्हता.

*-*-*

परिशिष्ट-दोन-ब

**महाराष्ट्र शासन**

पत्र क्र.-जमीन-४७१७/प्र. क्र.०२/ज-९,
महसूल व वन विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक-२१/०२/२०१८.

प्रति,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय,
विधानभवन, मुंबई-३२.

**विषय:- जमीन- यवतमाळ.**
वैद्यनगर सिंधी कॉलनी, आर्णि रोड, यवतमाळ मधील विस्थापित लोकांचे पुनर्वसन करताना दिलेल्या भूखंडातील सत्ता प्रकार ब-२ चे वर्ग अ-१ मध्ये भोगवटदार म्हणून नोंद घेण्याबाबत विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक...
ॲड. रामहरी रुपनवर, विधानपरिषद सदस्य.

महोदय,

उपरोक्त विषयावरील आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.४७४६/म.वि.स./विपविअस/ड-१५, दि. १७/०२/२०१८ च्या पत्रास अनुसरून गुरुवार, दि.२२/०२/२०१८ रोजी दुपारी १.३० वाजता आयोजित केलेल्या बैठकीसाठी ॲड. रामहरी रुपनवर, विधानपरिषद सदस्य यांच्या अर्जावर महसूल विभागाच्या अहवालाच्या ४० प्रती सोबत पाठवित आहे.

आपला

( चं. नि. पाडळे )
अवर सचिव, महसूल व वन विभाग.

सोबत - वरीलप्रमाणे.
प्रत-

उप सचिव, कार्यासन म-८, ज-१, ल-१, र-६, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना सहपत्राच्या प्रतीसह अग्रेषित.

**परिशिष्ट - दोन**

म. व. क. वि. / ज-१

**विषय:- जमीन- यवतमाळ.**
वैद्यनगर सिंधी कॉलनी, आर्णि रोड, यवतमाळ मधील विस्थापित लोकांचे पुनर्वसन करताना दिलेल्या भूखंडातील सत्ता प्रकार ब-२ चे वर्ग अ-१ मध्ये भोगवटदार म्हणून नोंद घेण्याबाबत विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक-.....
मा. ॲड. रामहरी रुपनवर, विधानपरिषद सदस्य.

**मुद्दा क्र. १**

जळगाव, धुळे व यवतमाळ जिल्ह्यातील विस्थापित सिंधी बांधवांच्या विस्थापितांना पुनर्वसनासाठी दिलेल्या भूखंडाचा "ब-२" सत्ताप्रकार बदलून "अ" सत्ताप्रकार अभिलेखाची नोंद करण्याबाबत वारंवार जिल्हा प्रशासनाला कळवून सुध्दा सदरच्या विषयावर कार्यवाही न होण्याबाबत.

विभागाचा अहवाल:-

१९४७ मधील फाळणीतील निर्वासित व्यक्तींना भरपाई संकोष मालमत्तेमधील वाटप करण्यात आलेल्या मिळकतींचा सत्ता प्रकार हा विविध ठिकाणी विविध प्रकारे उदा. अ, ब-२ इत्यादी नोंदविला गेला आहे. सदरहू धारणाधिकार "अ" असा करण्याबाबत जळगांव व धुळे जिल्ह्यातील मिळकत धारकांकडून प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने शासनाने अधिकार अभिलेखामध्ये अभिलिखित [illegible] महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम २५८ अन्वये पुनर्विलोकन करण्याबाबत जिल्हाधिकारी, धुळे यांना शासन पत्र दिनांक २८/०४/२००६, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना शासनपत्र दिनांक ३०/०५/२००६ व दिनांक २४/०६/२००८ च्या पत्रान्वये निदेश देण्यात आले होते. तसेच, जळगांव जिल्ह्यातील वसाहती संदर्भात दि. १३/०१/२०१० च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, जळगांव यांना अभिहस्तांतरण करारामध्ये (Conveyance deed) विनिर्दिष्टपणे नमूद केलेल्या मिळकतींना / क्षेत्रास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ खालील कलम २० (२) अनुसार चौकशीची कार्यवाही करुन अ-१ हा सत्ता प्रकार फक्त निवासी वापरासाठी लागू करण्यात यावा. असे निदेश काही अटी व शर्तीवर दिले आहेत.

जरीपटका, मेकोसाबाग, खामला, नागपूर व वैद्यनगर, यवतमाळ [illegible] सत्ता प्रकार [illegible] ऐवजी "अ" असा करण्याबाबत प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. २१/०१/२०१६ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. त्या वरुन असे निदर्शनास येते की, विस्थापितांना देण्यात आलेल्या जमिनी विविध प्रकारच्या दस्तान्वये वितरीत करण्यात आल्या असून उच्चतम किंमतीची बोली बोलणाऱ्या विस्थापितास जाहीर लिलावाद्वारे 'फ्री होल्ड' स्वरुपात जमिनी दिलेली प्रकरणे वगळता काही प्रकरणी जाहीर लिलावाद्वारेच मात्र भाडेपट्ट्यावर जमिनी दिलेल्या आहेत तसेच काही प्रकरणी जमिनीवरील केवळ इमारती भाडेपट्ट्याने दिलेल्या आढळतात. त्यामुळे या सर्व [illegible]

या श्री क्षेत्र स्वरूपाच्या नाहीत. अशा परिस्थितीत या मिळकतींचा सत्ता प्रकार बदलून तो "अ" असा करावयाचा झाल्यास त्याबाबत जाणीवपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत शासन स्तरावर त्यानुषंगाने सखोल विचार करुन धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे.

**मुद्दा क्र.२-**

निर्वासित वसाहती जमीन/ मालमत्ता निर्वासित इसम (नुकसान भरपाई व पुनर्वसन) अधिनियम १९५४ व त्या अंतर्गत तयार केलेल्या नियमाने सदरच्या सिंधी बांधवांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे. तसेच संकोष मालमत्तेमधील भुखंड निर्वासित व्यक्तींना वितरित करण्यात आले होते. या अधिनियमाबाबतची अंमलबजावणी महसूल व वन विभागाने पुढाकार घेऊन सिंधी बांधवांना दिलासा देण्यात यावा.

**विभागाचा अहवाल:-**

प्रस्तावाधीन जमिनीचे वाटप महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट लावणे), नियम १९७१ खालील नियंत्रित सत्ताप्रकाराने केल्याचे दिसून येते. जमिनीचे वाटप विस्थापित इसम (नुकसान भरपाई व पुनर्वसन ) अधिनियम १९५४ खाली झाल्याचे दिसून येत नाही. तसेच सन १९५१-५२ साली विस्थापित अधिनियम अस्तित्वात नव्हता.

सदरहु प्रकरणी दि. १९/०५/२०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता विधानभवन येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडून प्लॉट धारक विस्थापितांना देण्यात आलेल्या भूखंडाबाबत माहिती, वाटपाबाबत आदेश, चलन, ताबा पावती इत्यादी कागदपत्रे नुकतीच प्राप्त झाली असून त्याची छाननी करण्यात येत आहे.

*-*-*

# परिशिष्ट - तीन

## समितीच्या बैठका

**पहिली बैठक**

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक सोमवार, दिनांक २९ मे, २०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

(२) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(३) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः**

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव.

(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

(३) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

**विभागीय अधिकारी महसूल व वने (महसूल) विभाग-**

(१) श्री. मनु कुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव

(२) श्री. राजेंद्र क्षीरसागर, उप सचिव

(३) श्री. माधव वीर, उप सचिव

(४) डॉ. संतोष भोगले, उप सचिव

**जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ -**

श्री. नितीन व्यवहारे, उप जिल्हाधिकारी, यवतमाळ

समितीने विनंती अर्जाच्या संदर्भात विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय प्रधान सचिव (महसूल), उप जिल्हाधिकारी, यवतमाळ व अन्य अधिका-यांच्या साक्षी नोंदविल्या.

## दुसरी बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक गुरूवार, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी दुपारी १.०० वाजता कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.
(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.
(३) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(१) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. संजय कांबळे, अवर सचिव
(२) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

**विभागीय अधिकारी, महसूल व वन (महसूल) विभाग :**

(१) श्री. मनु कुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव
(२) श्री. शामसुंदर पाटील, सह सचिव
(३) श्री. राजेंद्र क्षीरसागर, सह सचिव
(४) श्री. माधव वीर, उप सचिव
(५) श्री. अजित देशमुख, उप सचिव
(६) श्री. चंद्रकांत पाडळे, अवर सचिव
(७) श्री. विलास थोरात, अवर सचिव
(८) श्री. प्रकाश इंदलकर, अवर सचिव

**जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ :**

(९) श्री. द.रा. गोसावी, प्रतिनिधी, जिल्हा परिषद भूमी अभिलेख, यवतमाळ

समितीने विनंती अर्जाच्या संदर्भात विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय प्रधान सचिव (महसूल) व अन्य अधिका-यांच्या साक्षी नोंदविल्या.

**तिसरी बैठक**

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक मंगळवार, दिनांक २० मार्च, २०१८ रोजी दुपारी १.०० वाजता कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. माणिकराव ठाकरे, उप सभापती महाराष्ट्र विधानपरिषद, तथा समिती प्रमुख.

(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.

(३) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(१) ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.

(२) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

(३) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

सदर बैठकीत समितीने प्रारूप अहवालावर विचारविनिमय करून तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई